ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 2 | OCTOBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# अकबर यांची धार्मिक सहिष्णूता



प्रा. भारत पांडुरंग आव्हाळे
असो. प्रोफेसर - रामराव झनक महाविद्यालय,
मालेगाव जि.वशिम.

इ.स. १५२६ च्या पानिपत लढाईनंतर बाबराल्न भारतात आपले राज्य स्थिर करताना मुसळमान धर्म व हिंदू प्रजा यांच्यातील विरोधाची चिकित्सा करण्यासही वेळ नव्हता. तर हुमायुनने आपल्या प्रजेच्या बाबतीत पूर्वीचेच धार्मिक धोरण पुढे चालू ठेवले. मात्र राज्याच्या स्थैर्याच्या दृष्टीने प्रजेचे हक्क व राज्याच्या मागण्या यांची सांगड घालण्याचा गंभीरपणे विचार करण्याचे श्रेय अकबराल्न जाते. भारताचा तिसरा मोकळा सम्राट अकबर हा हिंदूस्थानला आपला देश मानणारा पहिल मुसलमान राजा होय. लाहनपणीच अनेक संकटातून तावून-सुळाखून निघालेल्या या मोगल सम्राटाने आपल्या सहिष्णू धार्मिक धोरणाने मोगल साम्राज्याचा पाया मजबूत केला होता. अकबराने धर्माच्या आज्ञा व राज्याच्या गरजा यांचा उत्तम मेळ येथे घातल. जिझिया व यात्रा कर बंद करून हिंदूना सहिष्णूतेची वागणूक देणाऱ्या या मुस्लिम सम्राटाने राजपुतांशी विवाह संबंध ही प्रस्थापित केले. या गोष्टी मुस्लिम इतिहासात कधीही ऐकलेल्या नसव्या तरीही मुसलमान धर्म दूर प्रदेशापर्यंत नेणारा हा एक मुसलमानच होता.१. हे करीत असताना त्याने मुसलमान परंपरागत आवश्यक ते बदल केले. असे असले तरीही तो कुराणातील आज्ञांच्या विरुध्द कधीही गेल नाही. त्यामुळेच अकबराची गणना जगातील थोर राज्यकर्त्यात केली जाते. त्याच्या या उदार धार्मिक धोरणामुळेच त्याला हिंदू व मुसलमान प्रजेची सहानुभूती व प्रेम मिळाले. त्याच्या धार्मिक धोरणाचा विकास होण्यासाठी त्याचे आजोबा, पिता, त्याचे शिक्षक अब्दुल लतीक, संरक्षक बैरामखान आई हमिदाबेगम या सर्व शिया पंथीयांचे सुस्कृत व प्रगतशील विचार कारणीभूत ठरतात. त्याचबरोबर अकबराचे मित्र शेख अब्दुल फजल व अब्दुल फैजी यांच्या उदारमतचादी विचारांचाही प्रभाव अकबराबरावर होता. अकबराचे शिक्षक अब्दुल लतीफ, यांनी त्याला लहानपणापासूनच 'सुलुहकूल' (सर्वांशी शांततेने रहाणे) चा पाठ शिकवित होता. तसेच रजपूत स्त्रियांशी केलेल्या विवाहामुळे त्याच्या कुटुंबातील सनातनी व कर्मठ वातावरणात बदल होण्यास खुप मोठा हातभार लागल. २.अकबराने सर्व धर्माची समानता, सर्व धर्माविषयी आदर ,

श्रध्दा यावर आधारलेले धार्मिक स्वीकारून 'दिने-इलही' या नव्या धर्माची स्थापना केली आणि आपल्या नव्या धार्मिक धोरणास पूर्णच प्राप्त करून दिले. त्याचे हे धार्मिक धोरण 'सुलहकूल' यावर आधारलेले होते. त्याने आपल्या राज्यात याच धार्मिक धोरणाची अंमलबजावणी केली. त्यासाठी त्याने सर्व धार्मियांना आपापली अंमलबजावणी केली. त्यासाठी त्याने सर्व धार्मियांना आपापली प्रार्थना स्थळे व मंदिरे बोधण्याचे स्वातंत्र दिले. तसेच आपल्या राज्याच्या राज्यकारभारात धर्म, जात, सांप्रदाय असा कोणताही भेदभाव न करता बुध्दिमत्ता आणि कर्तबगारीनुसार पदे दिली. साम्राज्याच्या बारा प्रांतावर नेमलेल्या बारा अर्थमंत्र्यांपैकी आठवण हिंदू होते. यावरुन सार्वजनिक सेवेत केवळ गुणावरच भरती करण्याचा हा उपक्रम अकबराने, नेपोलियन व बेंटिंक यांच्या अगोदर खुप वर्षापुर्वीच राबविला होता हे लक्षात येते.३. बदायुनी, आणि ख्रिस्तिधर्मप्रसारकांनी अकबरावर टीक केली असली तरी अकबर हा धार्मिक दृष्टया जिज्ञासू वृत्तीचा होता. त्याने सर्व धर्मांचा अभ्यास करुन त्यातील सत्यावर विश्वास ठेवला होता.

## अकबर व इस्लाम धर्म :-

डॉ. व्हिंन्सेन्ट स्मिथच्या मते, अकबर त्याच्या कारकिर्दित सुरुवातीच्या काळात सुन्नी मुसलमान होता. परंतु हळूहळू त्याच्या धार्मिक विचारात बदल होत गेला. आणि त्यातूनच त्याने इ.स. १५७५ मध्ये फत्तेपूर सिक्रि येथे 'इबादतखाना' मावाची एक भव्य इमारत बांधली. या इमारतीमध्ये खास धार्मिक चर्चा च विचारविनिमय होत. याचठिकाणी दर गुरुवारी रात्री विविध धार्मिक विषयांवर वादविवाद होत. सुरुवातीला अकबराने याठिकाणी सुलतानपुराचा सुन्नी पंथी विव्दान मुल्ला अब्दुल्ला मखदूम - उल - मल्क व राज्याच्या मुख्य सरदार शेख. अब्दुल नबी आणि आणखी काही विव्दानांना चर्चेसाठी आंतत्रित केले होते. मात्र त्यांनी तत्वज्ञानावर चर्चा करण्याऐवजी एकमेकांची निंदा नाळस्ती व एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यास सुरूवात केली. ४. अकबराच्या अथक प्रयत्नानंतरही त्यांच्यामधला वाद कमी होत नसे. याबद्दल बदायूनी म्हणतो की 'हे विव्दान लोक एकमेकाच्या विरुध्द आरोप प्रत्यारोपाच्या रणमैदानात आपली जिद्दरूपी तळावर ओढून युध्द करीत होते. मतभेदांची भावना इतकी प्रबळ होती की ते एकमेकांना अज्ञानी आणि नास्तिक म्हणूनच बोळावत होते. हे लोक शिया सुन्नी, हनपी आणि शफी होते तरीही मतभेदांची सीमा ओळांडून धर्माच्या मुळ सिध्दांतावर आक्रमण करण्यास तयार झाले होते.५. या इबादत्तखान्यात अकबर उलेमांबरोबरच शिया व सुफी पंथाच्या विव्दानांनाही निमंत्रित करीत असे त्यामध्ये मुल्ला अकम्मद, हकीम अबुफतह, यांनी शिया पंथाचे तर शेख अबुल फैजी व बदक्षानचा मिझा सुलेमान यांनी सुफी पंथाच्या तत्तवाज्ञानाबद्दल अकबरास माहिती दिली होती. मात्र इस्लामधील एकाही तत्त्व्ज्ञाआने अकबराचे समाधान झाले नाही. त्यामुळेच त्याने इतर धर्माच्या विव्दान व पंडितांना इबादतखान्याची धार्मिक वादविवादासाठी खुली केली.६. या इतर धार्मियातील निमंत्रितांमध्ये हिराविजय सुरी, विजयसेन सुरी, भानुचंद्र उपाध्याय, जिनचंद्र (जैन), दस्तूर मेहरजी राणा पारसी, पुरोषत्तम पंडित आणि देवी तसेच गोव्यावरुन काही

इसाई पादरीना ही अकबराने आपल्या इबादतखान्यात निमंत्रित केले होते.७. त्याच्या या इबादतखान्यात विविध विषयांवर चर्चा होत असे. या विविध विषयांमधील चर्चेत स्वत: सहभागी होत असे. एखाद्या व्यक्तीला कायद्यानुसार किती विवाह करण्याचे अधिकार आहेत अशा विषयांवर चर्चा होत असे. या विविध विषयांमधील कायद्यानुसार किती विवाह करण्याचे आधिकार व्यक्तीला कायद्यानुसार किती विवाह करण्याचे अधिकार आहेत अशा विषयांवर देखिल इबादतखान्यात चर्चा होत असे. त्याकाळात अशा विषयांवर चर्चा होणे म्हणजे आश्चर्याचीच बाब मानावी लागेल येथे होणाऱ्या विविध प्रकारच्या वादविवादांमध्ये अबुल फजलची प्रमुख भूमिका असे. परंपरावादी सुन्नी उलेमांच्या विविध वर्गांना यात सहभागी करुन घेण्याचे काम त्याचेच होते. अबुल फजल अनेक विषयांमधील उलेमांचे आज्ञान कसे आहे हे दाखवून देत असे. इबादतखान्यात विविध विषयांवर होणाऱ्या वादविवांमुळे अकबराच्या धार्मिक विचारांचा विकास होण्यास खुप मोठा हातभार लागला. या वादविवादांचा दुसरा महत्त्वपूर्ण परिणाम म्हणजे अकबराची अशी एक दृढ धारणा बनली की विव्दान आणि ज्ञांनी पुरुष सर्वच धर्मात आढळतात मात्र त्याचा सत्याचा एक विशिष्ट धर्म नाही. ८. अकबरात धर्माच्या तौलनिक अभ्यासात रस असल्याने आपल्या इबादतखान्यात उळेमा, जेसुर, पाझर, पारशीदस्तूर, जैनमुनी, हिंदू संत पंडित अशांशी तो थेट संवाद साधत असे.

## अकबर आणि हिंदू धर्म :-

अकबर आपल्या इबादतखान्यातील धर्मचर्चेत विविध धर्माच्या विव्दानांना निमंत्रित करीत असे. त्यात हिंदू धर्माचेही काही विव्दान ब्राम्हन होते. त्यापैकी पुरुषोत्तमसंडीत आणि देवी या दोन विव्दांनानी अकबराला हिंदू धर्मविषयक शास्त्रशुद्ध माहिती दिली होती. ९. आपल्या पूर्वजांकडून आलेल्या परंपरा अकबराने मोडीत काढून आपल्या संयूक्त राज्याचा पाया मजबूत करण्याचे प्रयत्न त्याने केले. हिंदूच्या धार्मिक परंपरा, ध्येये व ज्यामधून हिंदूचे सामाजिक जीवन समजूसन आले होते अशा ऐतिहासिक व धार्मिक परंपरांचे आकलन मुसलमान समाजाला चांगल्या प्रकारे व्हावे यासाठी त्याने रामयन, हरिवंश, योगवसिष्ठ इत्यादी हिंदू पवित्र ग्रंथांचे फाशी भाषेत भाषांतर करण्याचा हुकुम दिला होता. त्याशिवाय मोगलदरबारात सुरुवातीपासून साजऱ्या होणाऱ्या काही हिंदू उत्सवात त्यांने महाशिवरात्र, राखीबंधन, दुसरा अशा उत्सवांची भर घातली. १०. अकबराच्या रजपूत राण्या आणि त्याचे रजपूत सरदार यांच्या सहवासाचा परिणाम त्याच्या स्वभावावर झाल होता. तो आपल्या रजपूत राण्यांबरोबर यज्ञयाग व शास्त्रोक्त धर्मविधी करीत असे बरायुनीच्या म्हणण्यानुसार, हिंदुना प्रसन्न करण्यासाठी रविवार व इतर दिवशी अकबराने आपल्या राज्यात पशुहत्या निशिद्ध ठरवली होती. हिंदू पोषाख चालिरीती, खानापानाबरोबरच तो हिंदू पद्धतीनुसार कपाळवर गंध लावणे, राजदर्शन ( अरोका दर्शन ) देणे इत्यादिंचा त्यांनी अंगीकार केला होता. त्याबरोबरच हिंदू धर्मातील पुर्नजन्म आणि कर्मवादाकडेही तो आकृष्ट झाला होता. ११. अत्यंत जाचक असा हिंदूवर लादवेल 'जिझिया' कर देखिल अकबराने इ.स. १५६४ मध्ये रद्द केला. हा कर रद्द करून अकबराने कल्याणकारी राज्य स्थापन

करण्याच्या दिशेने एकलेले एक महत्त्वाचे पाऊल होते. कारण हा कर रद्द करुन झाल्याने माणसामाणसात धर्मामुळे आलेल्या भेदभावाच्या मुळावरच घाव घातला होता. 'जिझिया' कराबरोबरच हिंदूना तिर्थशेत्रांना भेट देताना द्यावा लागणारा यात्रा कर ही अकबराने बंद केल. धार्मिक कार्याकरिता मुसलमान लोक धार्मिक स्वरुपाचा एक कर देत त्यास जकात म्हटले जाई. बिगर मुस्लिमांना या करातून वगळले होते मात्र त्यांना जकात ऐवजी 'जिझिया' द्यावा लागे. १२. अबुल फजल म्हणतो की या जिझिया कराच्या माध्यमातून राज्याला दरवर्षी जवळजवळ एक करोड मिळत होते. मात्र अकबराला जादा कराची ही कधी गरज नव्हती त्यामूळेच त्याने हा कर रद्द केल. कारण अकबर धर्माधर्मामध्ये कधीही भेदभाव करीत नव्हता. १३.

## अकबर आणि पारशी धर्म :-

अकबराने पारशी धर्मातील तत्वे जाणून घेण्यासाठी इ.स. १५७८ च्या सुमारास नवसरिचा पारसी धर्मगुरु दस्तूर मेहरजी राणा यास इबादतखान्यातील वादविवादात भाग घेण्यासाठी निमंत्रित केले होते. त्याने सांगितलेल्या पारशी धर्माच्या तत्वज्ञानाने प्रथापित होऊन अकबराने इ.स. १५८० नंतर सूर्य व अग्निल साष्टांग प्रणिपात करुन त्यांची आराधना करण्यास सुरुवात केली होती. त्याचबरोबर तो पारसी धर्मियांचे सण व उत्सव ही साजरे करीत असे बदायुनी लिहितो की 'मृताचे दफन करताना त्याचे डोके पूर्वेकडे ठेवण्याची आज्ञा सम्राटाने दिली होती. आणि सम्राट अकबर देखिल याच पद्धतीने रात्री झोपत असे' यावरुन पारशी धर्माच्या तत्वज्ञानाच्या प्रभाव ही अकबरावर पउल्याचे दिसून येते. १३.

## अकबर व जैन धर्म :-

तत्कालीन दस्ताऐवजावरुन हे स्पष्ट होते की, अकबर त्याच्या समकालीन सर्व धर्माच्या सिद्धांतांना आणि विचारांना जाणून घेण्यासाठी प्रयत्नशील असे. त्याच्या इबादतखान्यात इतर धर्म पंडिताप्रमाणे जैन धर्मगुरूंनाही त्याने स्थान दिले होते. त्यामध्ये श्वेतांबर मुनी हरिविजय सुरी, विजयसेन सुरी, भानुचंद्र उपध्याय, जिनचंद्र इत्यादींचा समावेश होतो. आपल्या दरबारी असणाऱ्या या धर्मगुरांना अकबराने 'जगद्गुरू' ही पदवी दिली होती. आईन-ए-अकबरीच्या शेवटच्या भागात अबुल फजलने इबादतखान्यात आलेल्या विव्दानांची सुची दिली आहे त्यात या जैन मुनींचाही उल्लेख सापडतो. हे सर्व श्वेतांवर पंथाची संबंधित होते. १४. अकबराने ६ जून १५८४ रोजी फर्मान काढून आपल्या अधिकाऱ्यांना आज्ञा केली होती की, ज्या ज्या ठिकाणी जैनी थांबले आहेत त्या त्या ठिकाणी जैन पर्युषण सण करावे व बारा दिवस पशुहत्या करू नये. जैन मुनींच्या उपदेशांमुळेच अकबराने शिकार रोखले मांस, खाणे व वर्षातून सहा महिने पशु-पक्ष्यांची हत्या करण्यावर बंदी घातली होती. अकबराच्या दरबारी असणाऱ्या शांतिचंद्र या जैन मुनीने अकबरासाठी एक कसीदा म्हटलं होता. तो संस्कृत मध्ये असून त्याचे शिर्षक 'कृप - रास - कोश' (सम्राट के कृपापूर्ण कार्योकाकोश ) असे आहे.

भानुचंद्र अकबराच्या शासनकाळात शेवटपर्यंत मोगल दरबारात होता. जहांगीर शासरकाळात ही त्याचा उल्लेख सापडतो. भानुचंद्राने सुर्याच्या हजार नावांची संस्कृमध्ये 'सुर्यसहस्त्रनाम' नावाची टीक लिहिली होती. आणि अकबराल या नावांचे महत्व समजावून सांगितले होते. त्यामुळे अकबर भानुचंद्राने सांगितलेल्या सुर्याच्या एक हजार नावांचा जप करीत असे. १५. राजानिती आणि धर्मांच्या क्षेत्रात अकबरावर भानुचंद्राचा प्रभाव दिसून येतो. १५९२ मध्ये अकबरावर भानुचंद्राचा प्रभाव दिसून येतो. १५९२ मध्ये अकबर भानुचंद्राबरोबर काश्मिर यात्रेस गेला होता. त्यावेळी त्याने शत्रूंजल पर्वतावर प्रार्थनेसाठी येणाऱ्या यांत्रेकरांवरील कर हटवण्याची माहिती मिळते. १६

## अकबर आणि शीख धर्म :-

गुरु नानकाने स्थापन केलेल्या या शीख धर्माचे मुख्य उदिष्टच हिंदू-मुस्लिम ऐक्य साधणे हे होते गुरू अमरदास, गुरु रामदास, गरु अर्जूनासिंह यांच्याशी अकबराचा चांगला परिचय होता. शीखांचा धर्मग्रंथ 'गुरुग्रथंसाहिबा' बद्दल अकबराला नितांत आदर होता. शीख धर्मगुरूंच्या प्रभावामुळेच अकबराने पंजाबला एक वर्षासाठी सारा माफी दिली होती. १७. शेती उद्योग आणि व्यापाराच्या दृष्टीने लाहोर सुभा अकबर काळात इतर सुभ्यांपेक्षा भरभराटीस आलेख होता. शेतीला पाणीपुरवण्यासाठी विहिरी मोठ्या प्रमाणावर होत्या असे अबुल फजह सांगतो. त्यामुळेच मोगल काळात लाहोर सर्वात मोठे व भरभराटीचे नगर म्हणून ओळखले जात होते. १८.

## अकबर आणि ख्रिश्चन धर्म :-

अकबराला जगातील विविध धर्माचे तत्वज्ञान समजून घेण्याची जिज्ञासा असण्यानेच त्याने गोष्टीतील पोर्तुगीज धर्मापदेशकांना ख्रिस्ती धर्माचे तत्वज्ञान समजून घेण्यासाठी आपल्या इबादतखान्यात निमंत्रित केले होते. १९. रुडोलफ, अक्देविबा, ॲन्टोनी, मान्सरेट, एनरिववेज, जेरोम, झेवेयर, पिनहॅरो, डी - गोएज, इत्यादी ख्रिस्ति मिशनऱ्यांच्या तत्वज्ञानाचा प्रगडा अकबराच्या मनावर होता. त्याने ख्रिस्ति धर्मप्रसारकांना आपल्या साम्राज्यात धर्मप्रसार करण्यासाठी सवलत दिली होती. त्यामुळे अकबर त्यांच्या धार्मिक उत्सवात सहभागी होत असे तसेच ख्रिस्ती प्रार्थना मंदिरांनाही भेटी देत. अकबराने आपल मुलगा राजपूत मुराद यास ख्रिस्ती धर्मोपदेशकांकडे सुपूर्द करून त्यास पाश्चात्य शास्त्रे व ख्रिस्ती धर्माचे ज्ञान देण्यास सांगितले होते. अबुल फजलला बायबलाच्या फारशी अनुवाद करण्याची आज्ञा देखील केली होती. यावरुन युरोपियन लेखक लिहितात की, 'इतर कोणत्याही धर्मापेक्षा अकबराचा ख्रिश्चन धर्माकडे जास्त ओढा होता.' पण ही अतिशयोक्ती वाटते. २०.

डॉ. स्मिथ आणि बलॉचमैन यांच्या मतानुसार अकबराने इस्काम ला पुर्णपने सोडले होते. सर वुल्जले हेग पही यांच्या मताचा स्वीकार केल आहे. मात्र बेवरीजच्या मतानुसार अकबराने त्याचा धर्म पूर्णत: सोडल नव्हता मात्र तो नास्तिक बनला होता. नोअरच्या मतानुसार अकबराचा धर्म पारसी - सुफी - हिंदू धर्म होता. आणि तो इस्कामची श्रेष्ठता उखडून टाकू पाहत होता. मोहम्मद हुसेन आजाद

**म्हनतो, 'अकबराने जे काही केले ते राजकीय दृष्टीकोणातून केले. त्याची नवीन धारणा पूर्णपणे इस्लामशी मिळती जूळती नव्हती तरी तो नास्तिक नव्हता.' २१. अकबराचा विश्वास होता की संपूर्ण सत्य कोणत्याही एक धर्माची ठेकेदारी नाही. त्याने मुसलमानांना प्रचलित असणाऱ्या कोणत्याही विचारधरिचे अथवा मताचे समर्थन केले नाही. म्हणून त्याने इस्लामला सोडले असे नाही. त्याचे धार्मिक विचार त्याच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक होती. त्याने कायमच ईश्वराची इच्छा जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्याला विश्वास होता की त्याचे प्रत्येक कर्म ईश्वराला अर्पण आहे. अकबराच्या विविध धर्माविषयी असलेल्या दृष्टीकोणाचा सारासार विचार केला असता त्याचे विचार अत्यंत उच्च दर्जाचे होते. त्याचे व्यक्तीमत्व थोर होते. विविध धर्माच्या विव्दान पंडितांना त्याने आपल्या दरबारी राजाश्रय दिल्याने त्याचा धर्मसहिष्णू दृष्टीकोण आपल्याला दिसून येतो. त्योन केवळ राजकीय ऐक्यावर समाधान मानले नाही तर सामाजिक, आर्थिक, धार्मिक, व सांस्कृतिक ऐक्याच्या आधारावर नवभारताच्या निर्मितीचा पाया दृढ करण्याची कास त्याने धरली होती. त्याच्या या धर्मसहिष्णू दृष्टिकोणामुळे त्याने अचाट कर्तबगारीबरोबरच भारतात एकछत्री विशाल साम्राज्याची स्थापना केली.**

## संदर्भ


१. अबुल फजल, अकबरनामा ३.पृ. ७५७
२. प्र. कृ. ढवळे, बाळकृष्ण बारगळ, मध्यकालीन भारत, (इ.स. १२०६ ते इ. स. १७६१) नागपूर, १९६८, पृ ११९
३. के. एन. चिटणीस, मध्ययुगीन भारतीय संकल्पाना व संस्था भाग - १, आवृत्ती - २ संकल्पना व प्रशासन, पूणे १९८५, पृ ११३
४. उपरोक्त ; ढवळे बारगळ, पृ. ११९
५. विदयाधन महाजन, मध्यकालीन भारत, (1000 ई. से १७६१ ई. तको एस. चंद ॲन्उ कंपनी नवी दिल्ली २००२, पृ, १०९.
६. उपरोक्त, ढवळे, बारंगळ, पृ . २००
७. उपरोक्त विद्याधर महाजन , पृ. ११०
८. हरिशचंद्र वर्मा, (संपा)] मध्यकाळालीन भारत, भाग-२, ( 1540 - १७६१०), दिल्ली विश्वविद्यालय, २००७, पृ. १२७ - १२८.
९. उपरोक्त, विद्याधर महाजन, पृ. ११०.
१०. उपरोक्त ; के एन. चिटणीस, पृ. ११३
११. उपरोक्त ; ढवळे, बारगळ, पृ. १२६
१२. उपरोक्त ; के. एन. चिटणीस, पृ ११२
१३. उपरोक्त ; हरिशचंद्र वर्मा, पृ . १२६
१४. उपरोक्त :ढवळे, बारगळ, पृ. २००

१५.**इरफान हबीब, (संपा), अकबर और तत्कालीन भारत नरेश नदीम (अनुवाद), राजकमल प्रकाशन नवी दिल्ली,**
१६. **उपरोक्त ; ३४**
१७.**उपरोक्त ; हरिशचंद्र वर्मा, पृ. १०**
१८.**उपरोक्त ; इरफान हबीब, पृ. २५५ - २५६**
१९. **उपरोक्त हरिशचंद्र वर्मा, पृ.११०**
२०.**उपरोक्त ; ढवळे, बारगळे, पृ.२०१**
२१.**उपरोक्त हरिशचंद्र वर्मा, पृ. १२२**